MCHI CREDAI

PRESENTS

MCHI - CREDAI

PROPERTY 2015

EXCLUSIVE ONLINE PARTNER

HOUSING

# प्रॉपर्टी एक्झिबिशनच्या रौप्य महोत्सवी आवृत्तीच्या प्रसंगी एम सी एच आय - क्रेडाईने हाऊसिंग.कॉम(Housing.Com) सोबत केली आपल्या धोरणात्मक भागीदारीची योजना

*ज्याची अतिशय आतुरतेने वाट पाहत होतो ते एम सी एच आय - क्रेडाई द्वारे आयोजित रियल इस्टेट एक्स्पोचे २५ वे प्रकाशनाचे अप्रत्यक्ष प्रदर्शन २५ दिवसांपर्यंत चालणार असून त्यात ४थ्या दिवसाच्या ऑन ग्राऊंड इव्हेंटनंतर ग्राहकांना सेवा देणे सुरु राहिल.*

**मुंबई १५ ऑक्टोबर २०१५:** एम सी एच आय - क्रेडाईने आपल्या भारतातील सर्वात नवीनतम रियल इस्टेट मंचाशी हाऊसिंग.कॉम शी आपल्या धोरणात्मक भागीदारीएची प्रोपर्टी एक्झिबिशनच्या २५व्या आवृत्तीच्या प्रसंगी घोषणा केली. भारतातील रियल इस्टेट पर्यावरण यंत्रणा सुधारण्यासाठी या काळच्या सर्वाधिक प्रतीक्षित सोहळयामध्ये २५० पेक्षा जास्त आघाडीचे विकासक (प्रदर्शक) सहभाग घेणार असून ४ दिवसांच्या ऑन ग्राऊंड सोहळयानंतर २१ दिवसांसाठी सर्वप्रथम माफक दरातील निवासाचा हा मंच आणि पहिले वहिले अप्रत्यक्ष प्रदर्शन सुरु राहणार आहे.

विकासक आणि अपेक्षीत गृह खरेदीकर्त्यांसाठी रियल इस्टेटचे श्रध्दास्थान असलेल्या २५ व्या रौप्य महोत्सवी प्रदर्शाच्या अवृत्तीची घोषणा करताना, **एम सी एच आय - क्रेडाईचे अध्यक्ष श्री धर्मेश जैन** म्हणाले की,"येणा-या २५ व्या रौप्य महोत्सवी अवृत्तीसोबत एम सी एच आय-क्रेडाई युगांपासून येत आलेले आहे. हे भारतातील सर्वात मोठे प्रॉपर्टी प्रदर्शन आहे जिथे सर्व स्टेक होल्डर्सना नजीकच्या काळामध्ये घोषित केल्या गेलेल्या दरातील कपातीमुळे तसेच रियल इस्टेट बाजारपेठेच्या भावनात्मक आशावादामुळे अर्थकारणाच्या सकारात्मक स्थितीचा फायदा मिळायला हवा. या भागीदारीमुळे आम्हा दोहोंना प्रत्येकाच्या प्रबळतेसाठी महान सहक्रियता आखण्यासाठी मुभा मिळणार आहे.

पारंपारिक पध्दतींना मागे ठेवत एम सी एच आय - क्रेडाईच्या प्रॉपर्टी एक्झिबिशन २०१५ ने आपल्या धोरणात्मक भागीदार हाऊसिंग.कॉमच्या सहयोगाने घराची खरेदी करणा-या व्यक्तींना कधीही विसरु शकणार नाही असा अनुभव देण्याचे वचन दिले आहे. या भव्य सोहळयामध्ये एम सी एच आय- क्रेडाई ग्राऊंड इव्हेंट्स नंतर २१ दिवसांसाठीच्या अप्रत्यक्ष प्रदर्शनासारख्या आगळया वेगळया संकल्पनेची ओळख करुन देणार आहे, १० लाखांपासून सुरु होणारी स्वस्त दरातील घरे, घर खरेदी करणा-यांसाठी आश्वासक बक्षिसे आणि प्रत्येक घर बुकिंगवर २५००० रुपयांच्या शाश्वत रोख रक्कम परताव्या सारख्या अभूतपूर्व संकल्पना देखील आणत आहे.

**हाऊसिंग.कॉम (Housing.Com) चे मुख्य व्यावसायिक अधिकारी श्री जॅसन कोठारी** म्हणाले की,"हाऊसिंग.कॉम (Housing.Com) आणि एम सी एच आय-क्रेडाईच्या तीन वर्षांचा धोरणात्मक करार हा रियल इस्टेट उद्योगातील सर्वप्रथम करार आहे. विकासामध्ये एम सी एच आय-ची प्रसिध्दी हाऊसिंग.कॉम (Housing.Com) च्या अत्याधुनिक आणि विश्वासार्ह रियल इस्टेट मंचासोबत मिळून विकासक आणि खरेदीकर्त्यांनी एकमेकांशी कसा संवाद साधला पाहिजे याची पुन्हा एकदा व्याख्या तयार करेल. एकत्रित स्वरुपातील आमचे ध्येय म्हणजे पर्यावरणाला वाढत्या पारदर्शकतेने समृध्द करणे होय, जी डिजीटल प्रोलिफरेशन आणि विकासक आणि ग्राहकांना अधिक संपन्न माहिती हाताळता येण्याच्या माध्यमातून सुधारली जाईल. वर्च्युअल एक्स्पो प्रसदर्शनाला ऑफलाइनवरुन ऑनलाइन आणण्यास प्रयत्न करणार असून हे आमचे या दिशेतील पहिले पाऊल आहे तसेच आम्ही येणा-या वर्षांमध्ये अशाप्रकारच्या अधिकाधिक मंचाच्या निर्मितीकडे लक्ष देणार आहोत."

राष्ट्रीय स्तरावर घेतले जाणारे हे देशातले पहिले आगळेवेगळे प्रदर्शन असून यामध्ये "लॉंच पॅड" सारखे गुणविशेष, नवीन प्रकल्पांची ओळख करुन देण्याची मुभा देतात. सर्व आघाडीच्या विकसक संस्थांच्या सहभागासोबत रौप्य महोत्सवी प्रदर्शनामध्ये देशाच्या कानाकोप-यातील विकसक सहभाग घेणार आहेत आणि त्यांच्या प्रकल्पांचे अपेक्षित ग्राहकांच्या समोर प्रदर्शन करणार आहेत.

या वर्षाच्या अवृत्तीतील महत्वाचा यू एस पी म्हणजे हाऊसिंग.कॉम (Housing.Com) सोबत ४ दिवसांच्या ऑन ग्राऊंड इव्हेंट नंतर २१ दिवसांसाठीचे विस्तारीत वर्च्युअल प्रदर्शन होय. यामध्ये माफक दरातील व्यासपीठ उपलब्ध करुन दिले जाणार आहे, ज्याद्वारे मध्यम उत्पन्न असणा-या खरेदीकर्त्यांच्या गरजा पूर्ण करणा-या माफक दरातील प्रकल्पांना प्रदर्शित केले जाणार आहे. या व्यतिरिक्त यामधल्या महाराष्ट्र मंच, इंटरमिडिएट मंच, पॅट्रोन मंच सारखे मंच तसेच विभागांनुसारचे मंच उदा. मध्य आणि पश्चिम मंच या सारखे विभाग आहेत. प्रदर्शानमध्ये खरेदीकर्त्यांना मैत्रीपूर्ण अनुभव येण्यासाठी प्रदर्शनामध्ये "वॉट इज वेयर" ही एक डिजीटल वॉल आहे, जी संपूर्ण स्थळाचा आराखडा दाखवण्यासाठी मार्गदर्शक ठरेल.

**गेल्या २४ अवृत्त्यांपासून सुरळीत मार्गक्रमण करणारे** एम सी एच आय - क्रेडाई प्रॉपर्टी एक्झिबिशन २०१५ हे भारतातील रियल इस्टेट क्षेत्रातील सूपर मार्केट असून याचे उद्देश म्हणजे सोडतींची आणि ऑफर्सची बरसात करुन प्रत्येक घर खरेदीकर्त्याची स्वप्नपूर्ती करणे होय. भारतातील सर्वात मोठ्या २५ अवृत्तीचा आरंभ २९ ऑक्टोबर

२०१५ रोजी सकाळी १० ते रात्रौ ८ वाजल्यापासून होणार असून त्याची सांगता १ नोव्हेंबर २०१५ ला होणार आहे, या सोहळा एम एम आर डी मैदान बी के सी येथे आयोजित केला जाणार आहे.

**महाराष्ट्र चेम्बर्स ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री (एमसीएचआय - क्रेडाई) (www.mchi.net)**

महाराष्ट्र चेम्बर्स ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री (एमसीएचआय - क्रेडाई) ची स्थापना 1982 मध्ये झाली असून ते मुंबई आणि एमएमआर क्षेत्रातील सर्वात प्रसिद्ध आणि एकमेव मान्यताप्राप्त मंडळ आहे.

एमसीएचआय – क्रेडाईतर्फे रियल इस्टेट डेव्हलपमेंटशी निगडीत सदस्य एकाच व्यासपीठावर एकत्र येतील आणि उद्योगासमोर असलेल्या समस्या मांडतील. या मंडळाकडे मुंबईतील अग्रगण्य अशा 1800 विकासकांचे सदस्यत्व आहे. एमसीएचआय – क्रेडाईचा विस्तार एमएमआर परिसरापर्यंत झालेला असून त्यांची ठाणे, कल्याण- डोंबिवली, मीरा-वसई शहर, रायगड आणि नवी मुंबई अशी युनिट आहेत. एमसीएचआय – क्रेडाई हे महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकार मान्यताप्राप्त मंडळ असून त्यांच्या गृह पुरवठा मागणीला हातभार लावते. घर ही प्रत्येकाची मुलभूत गरज आहे.

एम सी एच आय- क्रेडाई आपल्या सभासदांना आणि समाजाला मोठ्याप्रमाणामध्ये सर्वोत्तम सेवा देण्यासाठी झटत असते. रियल इस्टेट आणि हाऊसिंग क्षेत्राच्या वृध्दिची शाश्वती देण्यासाठी ही संस्था समर्पित आहे, ज्यामुळे प्रत्येक भारतीय नागरिकाचे जीवन समृध्द होते आणि भारताच्या एकंदरीत विकासाला फार मोठा हातभार लागतो.

हाऊसिंग.कॉम (Housing.com) बद्दल

२०१२मध्ये प्रस्थापित झालेली हाऊसिंग.कॉम भारताच्या आघाडीच्या ऑनलाइन इस्टेट मंचांपैकी एक असून मासिक ८ दशलक्ष हिट्स, सद्यस्थितीपर्यंत १ लाख तपासणी केलेली घरे आणि अद्वितिय ऑनलाइन युजर अनुभव देणारी ही एक अग्रेसर संस्था आहे. ही कंपनी म्हणजे रियल इस्टेट पार्श्वभूमीवर तांत्रिकदृष्ट्या नवीनीकरण आहे, ज्यामार्फत भारतातील रियल इस्टेट वातावरणामध्ये अधिक प्रमाणामध्ये पारदर्शकता, सक्षमता आणि विश्वास आणण्याचा विस्तिर्ण दृष्टीकोन ठेवला गेला आहे. हाऊसिंग.कॉम (Housing.com) ही सूचीबध्द केल्या गेलेल्या प्रत्येक घराची प्रशिक्षित डेटा संग्राहक संघ, समिक्षक, लेखापरिक्षक आणि फोटोग्राफर्स यांनी एकत्रित येऊन केलेल्या स्वतंत्र तपासणीची मुभा देणारी एकमेव कंपनी आहे. प्रति लिस्टिंगमध्ये १२० पेक्षा जास्त डेटा पॉइंट्स सोबत इनहाऊस डेटा सायन्स लॅब एका महत्वपूर्ण माहिती माध्यमाने सक्षम झाली आहे, ज्याद्वारे ग्राहकांना आणि विक्रेत्यांना अधिक प्रमाणामध्ये सूचित निर्णय घेण्यासाठी माहिती पुरवली जाते.

५० शहरांमध्ये अंदाजे २५०० कर्मचा-यांसोबत हाऊसिंग फायनान्स.कॉम भारताच्या रियल इस्टेट आव्हानांना सोडवण्यासाठी ३६० अंश दृष्टीकोन बाळगण्याबद्दल महत्वाकांक्षी आहे. हाऊसिंग.कॉम (Housing.com) ने अनेक धोरणात्मक अधिपत्यांना मार्गी लावले आहे उदा. घरांच्या खरेदी विक्रीसाठी भारताचा सर्वात मोठा सामाजिक मंच (इंडियन रियल इस्टेट फोरम), एक संस्थापित कंपनी जी नवीन रियल इस्टेट प्रकल्पांच्या (रियॅल्टी बिझनेस इंटिलिजन्स) वेळेवर केल्या जाणा-या परिश्रमांवर लक्ष केंद्रित करते तसेच विकसकांसाठी एक प्रसिध्द सॉफ्टवेयर ज्यामुळे त्यांच्या विपणन आणि विक्रीच्या परिश्रमांची व्यवस्थापन आणि सुधारणा होते( होम बाय३६०)

हाऊसिंग.कॉम (Housing.com) ने १०० लाख डॉलरपेक्षा जास्त भांडवलाची भारताच्या आघाडीच्या गुंतवणूकदारांकडून उभारणी केली असून त्यात सॉफ्ट बँक,नेक्सस वेंचर्स, फाल्कन एज, हेलियन वेंचर्स, निर्वाणा वेंचर्स, क्वालकॉम, डी एस टी फाऊंडर युरी मिलनेर, वायाकॉम १८ सहसंस्थापक हरेश चावला, स्नॅपडील संस्थापक कुणाल भाल आणि रोहित बंसल यांचा समावेश होतो.